# ‘मोह’ एक वरदान

श्रीमद् नामचैतन्य भानुदास
दि. ०८-१२-२००९
दैनिक सकाळ, मुंबई यांच्या सौजन्याने

‘मोह हा रिपूच मानवाला मायेत अडकायला कारणीभूत ठरतो’, असं शास्त्री, पंडित मानतात. म्हणूनच तर ‘मोह माया’ हा शब्दप्रयोग प्रचलित झाला. पण खरं सांगू का? मानवाला मोह हा रिपू नसता, तर त्याचं जीवन जनावरांप्रमाणे उदास आणि निरस झालं असतं. मोह या रिपूतील लक्ष्मणरेषेचा विचार केला तेव्हा असं लक्षात आलं, की ‘आसक्ती’ हा या रिपूचा त्याज्य भाग असून ‘आकर्षण’ हा व्यवहार्य भाग आहे. अनासक्त आकर्षण हे आनंददायी असतं. मनात उत्पन्न होणारं आकर्षण हे पंचज्ञानेंद्रियांमार्फत सुखद आणि आल्हाददायक अनुभव घेतं. संगीत श्रवण, पदार्थाची चव, सौंदर्याचं दर्शन, सुगंधाचा आस्वाद, गारवा तसच उबदारपणा किंवा प्रेमाचा स्पर्श या सर्वांचच मानवाला ‘आकर्षण’ असतं. हे आकर्षणच मन प्रसन्न करतं. मनाला आनंद देतं. मात्र या आकर्षणाचं आसक्तीत रूपांतर होता कामा नये. यातील लक्ष्मणरेषा मात्र प्रयत्नपूर्वक सांभाळायला हवी. कारण ‘आसक्ती’ ही मनाला किंवा शरीरालाही क्लेशदायक आणि हानीकारक ठरते. ज्यावेळी विश्वामित्रांच्या मनात मेनकेविषयी आकर्षणातून आसक्ती उत्पन्न झाली, त्यावेळी त्याचा पुढे कसा विपरीत परिणाम झाला हे तुम्हाला माहीत आहेच. आता आकर्षणाचं एक छानसं उदाहरण पाहू. इंदूर संस्थानचे महाराज तुकोजीराव होळकर हे करारी, कलाप्रेमी आणि सर्वगुणसंपन्न होते. इंदूरमध्येच बाबूखाँ नावाचे एक सतारवादक अवलिया राहात होते. अतिशय लहरी पण संगीतमय झालेले. इंदूरच्या राजवाड्यात प्रवेश मिळणं फार कठीण असे, पण बाबूखाँना मात्र लहर येईल तेव्हा राजवाड्यात येऊन सतार वाजवण्याची परवानगी महाराजांनी दिली होती. एखाद्या भांड्याचा, घंटेचा कशाचाही नाद कानावर पडला, की बाबूखाँच्या मुखातून उद्गार निघायचे, ‘‘आहा क्या पंचम है’’, ‘‘क्या गंधार है’’. एकदा महाराजांनी पाहुण्यांपुढे बाबूखाँच्या सतार वादनाचा कार्यक्रम ठेवला. शिष्याने मनधरणी करून मोठ्या मुष्किलीने बाबूखाँना तयार केलं. उशीर होतोय म्हणून समोर आलेल्या टांग्यात सतार घेऊन दोघं बसले. टांगा चालू लागला. काही क्षणातच बाबूखाँ शिष्यावर कडाडले, ‘‘उतर नीचे, ये घोडा है या गधा?’’ सतार घेऊन शिष्य बाबूखाँ बरोबर खाली उतरला. सुदैवाने पाठोपाठ बाबूखाँचा आवडता तगडा घोडा असलेला टांगा आला. त्यात दोघं बसले. टांगा चालू लागला. ‘‘आहा क्या चाल है–नाधींधींना नाधींधींना’’ बाबूखाँ उद्गारले. त्या तालाच्या धुंदीतच ते दरबारात पोचले. कार्यक्रम सुरू झाला. सतारीचा प्रत्येक झंकार श्रोत्यांच्या काळजापर्यंत पोचत होता. साडेतीन तासांनंतर श्रोतृवृंद स्वर्गीय झंकार नादातून भानावर आला. संगीताच्या आकर्षणामुळेच हा आनंद सोहळा साजरा झाला ना? सदरात यापुढे आपण लोभ या रिपूचा विचार करू.